महाराष्ट्र शासन

प्रमआयो-जी-२०२३/प्र.क्र291/योजना-१०
ग्राम विकास व पंचायत राज विभाग,
बांधकाम भवन, २५ मझवान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक:-१५ डिसेंबर, २०२३.

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (चंद्रपूर,नांदेड,नाशिक,पालघर,पुणे,रायगड,रत्नागिरी,सातारा,सिंधुदुर्ग, ठाणे व यवतमाळ).**

**विषय :- प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबासाठी घरकुल योजनेअंतर्गत सर्वेक्षण, लाभार्थ्यांची निवड आणि नोंदणी प्रक्रियेबाबत कालबद्ध कार्यक्रम**

**संदर्भ** :- १) मा. श्री.अनिल कुमार सिंह. अवर सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. L-१२०५१/०१/२०१३-RH, दि.११/१२/२०२३.

२) मा. श्री.अनिल कुमार सिंह, अवर सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेपत्रक्र.DO.No.P-१७०२५/२६/२०२३-RC-Part(१)(e-३८६६२५) दि.१३/१२/२०२३.

३) मा. श्री.अनिल कुमार सिंह, अवर सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. J-११०१३/०२/२०२३-RH-Pol(e९३८६६६९), दि.१३/१२/२०२३.

४) मा. श्री.अनिल कुमार सिंह, अवर सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. J-११०१३/२/२०२३-RH-Pol(e-३८६६६९), दि.१४/१२/२०२३.

५) मा. श्री. गया प्रसाद, उप महा निदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. J-११०१३/२/२०२३-RH-Pol(e-३८६६६९), दि.१५/१२/२०२३.

भारत सरकारने प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) ला ९ मंत्रालयांद्वारे ११ विशेष बाबीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मान्यता दिली आहे. PM JANMAN अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना मुलभूत सुविधांसह पक्की घरे बांधण्यासाठी प्रती घरकुल रु. २.३९ लाख (घरकुल अनुदान २.०० लाख, १२,०००/- SBM-G आणि मनरेगा अंतर्गत ९०/९५ दिवसांचे अकुशल वेतन रु. २७०००/- अंदाजे) अशी तरतूद केली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) च्या मार्गदर्शक सूचना(FFI) मध्ये पत्र क्र. L - १२०५१ / ०१ / २०१३ - RH दिनांक १२.१२.२०२३ या पत्राद्वारे या मिशनच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर कृती आराखडा राज्यांना देण्यात आला होता.

राज्यांनी सर्वेक्षण (survey) आणि नोंदणी प्रक्रिया (registration process) १५.१२.२०२३ पासून सुरू करून ०५.०१.२०२४ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे. PM JANMAN योजनेंतर्गत घरांसाठी पात्र कुटुंबांची निवड करण्यासाठी व सर्वेक्षणाच्या वेळीच लाभार्थी नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी Awaas + App मध्ये बदल करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये लाभार्थी निवडीच्या

निकषामध्ये सुधारणा करून या योजनेमध्ये लाभार्थी निवड करताना प्रामुख्याने खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे त्यामध्ये-

१) लाभार्थी कोलाम, कातकरी व माडीया गोंड या आदिम जमातीमधील असावा.

२) लाभार्थ्याकडे कुठेही पक्के घर नसावे.

३) लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य शासकीय सेवेत नसावा.

**PM JANMAN** योजनेंतर्गत सर्वेक्षण व नोंदणी करण्यासाठी खालील प्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यात यावे.

| अ.क्र. | पद | पात्रता/निवड | जबाबदारी / करावयाचे काम | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | डेटाएंट्री ऑपरेटर | CSC केंद्र चालक/ ग्राम रोजगार सेवक / ग्रामीण गृह अभियंता (RHE)/ किंवा किमान 12 वी उत्तीर्ण, ग्रामीण क्षेत्राची माहिती असलेला व्यक्ति. | Awaas Plus App मध्ये आदिम जमाती (PVTG) मधील कुटुंबांचे सर्वेक्षण व अचूक नोंदणी करणे. प्रगणक यांच्या सुचनेचे पालन करून सर्वेक्षण पूर्ण करणे. | एका डेटा एन्ट्री ऑपरेटरास प्रति कुटुंब रु.३०/- इतके मानधन अदा करता येईल. |
| २ | प्रगणक व पर्यवेक्षक | संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक | प्रगणकास डेटाएंट्री ऑपरेटर समवेत आदिम जमाती (PVTG) मधील कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण करावयाचे आहे. सदर सर्वेक्षण करताना मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे तसेच डेटाएंट्री ऑपरेटर यांनी नोंद केलेल्या माहितीची शहानिशा करून सर्वेक्षण व नोंदणी पूर्ण करावयाचे आहे व याकामाचे पर्यवेक्षण देखील करावयाचे आहे. | एका प्रगणकास प्रति कुटूंब रु.८/- मानधन इतके अदा करता येईल. |

वरीलप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून घेत असताना स्थानिक व प्रासंगिक अडचणी विचारात घेऊन खर्चाच्या मर्यादेत राहून अनुषंगीक बदल संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना करता येतील. सर्वेक्षणासाठी स्वंयघोषणापत्र व पोचपावती नमुना सोबत जोडला आहे.

या सर्वेक्षणाचे नियोजन व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (अध्यक्ष), प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सदस्य सचिव) आणि जिल्यातील सर्व गट विकास अधिकारी (सदस्य) यांची समिती असेल. संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्यांच्या जिल्ह्यातील सर्वेक्षणाच्या एकूण संख्येनुसार प्रकल्प संचालक आणि गट विकास अधिकाऱ्यांनी किमान ५% कुटुंबे सर्वेक्षण कालावधीत randomly तपासावीत याची अट घालून द्यावी. या सर्वेक्षणाच्या मुख्य घटकावरील येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण च्या उपलब्ध प्रशासकीय निधीतून करण्यात यावा.

PM JANMAN योजनेंतर्गत सर्वेक्षण व लाभार्थी नोंदणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृती | कालमर्यादा | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | **सर्वेक्षण व नोंदणी प्रक्रिया :-** | | |
| | १) Ministry of Tribal Affairs (MoTA) द्वारे निवड केलेल्या ग्रामपंचायती मध्ये अद्ययावत आवास प्लस app द्वारे सर्वेक्षण करणे.<br>२) आदिम जमाती मधील कुटुंबांचे सर्वेक्षण (स्थळ पाहणी झालेल्या कुटुंबांचे) व नोंदणी प्रक्रिया (जॉब कार्ड, आधार कार्ड व बँक खाते इ. नोंदणी) तसेच bank account PFMS मार्फत verify करणे. | दि. १५ डिसेंबर २०२३ ते ५ जानेवारी २०२४ | ग्रामसेवक व गट विकास अधिकारी |
| २ | **मंजूरी प्रक्रिया :-** | | |
| | उद्दिष्टानुसार लाभार्थ्यांची अंतिम मंजूरी करावी व त्यानुसार आवास सॉफ्ट प्रणालीवर जिल्हास्तरावरुन सदर लाभार्थ्यांना Online मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करणे. | दि. १० जानेवारी २०२४ पर्यंत | मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक |
| ३ | **पहिला हप्ता वितरीत करणे:-** | | |
| | जिल्हास्तरावरुन आवास सॉफ्ट प्रणालीवर मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांना तालुकास्तरावरुन पहिला हप्ता तातडीने वितरीत करण्यात यावा. | दि. १५ जानेवारी २०२४ पर्यंत | गट विकास अधिकारी व सहाय्यक लेखाधिकारी |
| ४ | **घरकुलांची कामे सुरु करणे:-** | | |
| | मंजूरी /पहिला हप्ता मिळालेल्या घरकुलांची कामे तातडीने सुरु होतील याची दक्षता घ्यावी. | दि. २० जानेवारी २०२४ पर्यंत | ग्रामसेवक व गट विकास अधिकारी |

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN)अंतर्गत आदिम जमातीतील (कोलाम, कातकरी व माडीया गोंड) पात्र कुटुंबासाठी घरकुल योजना ही केंद्र शासनाची महत्वकांक्षी योजना आहे. तसेच, केंद्र शासनाने याप्रकरणी विहीत कालावधीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून ही बाब विचारात घेता, वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक पूर्व तयारी जिल्ह्याने करावी. जिल्हयातील लाभधारकांना याची माहिती होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व प्रगणक निश्चिती, डेटा एन्ट्री ऑपरेटर निश्चिती, आवश्यक व्यवस्था आपल्या स्तरावर करण्यात यावी. सदर योजनेसाठी सर्वेक्षण व नोंदणी विहित कालावधीत पूर्ण करणे याची दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

18/12/23

**(एकनाथ डवले, भा.प्र.से.)**
प्रधान सचिव
ग्राम विकास व पंचायत राज विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
२. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई यांना कार्यावाहीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

## कुटुंबप्रमुखाचे स्वयंघोषणा पत्र

मी, श्री. / श्रीम.-------- वय वर्षे---, मु. पो.--- ता.---- जि.----- स्वयंघोषीत करीत आहे की, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान **(PM-JANMAN)** अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबासाठी घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणाकरीता मी माहिती दिलेली असून सदर माहिती बरोबर आहे. सदर माहिती कोणत्याही टप्प्यावर चूकीची अथवा खोटी आढळल्यास शासन नियमानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच, मला शासनाच्या घरकुल व अन्य कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही याची पूर्ण जाणीव आहे.

स्वाक्षरी-----------

कुटूंबप्रमुख / कुटूंब सदस्याचे नाव------------

## प्रगणक आणि डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे स्वयंघोषणा पत्र

मी, श्री. / श्रीम.------ डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि श्री. / श्रीम.------- प्रगणक संयुक्तपणे स्वयंघोषीत करीत आहोत की, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान **(PM-JANMAN)** अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबासाठी घरकुल योजनेअंतर्गत श्री/श्रीम.----------- या इच्छूक लाभधारकाचे सर्वेक्षण आम्ही केले आहे. सदर सर्वेक्षणाकरीता इच्छूक लाभधारकाने जी माहिती दिलेली आहे ती त्याच्यासमोर तपासून खात्री करुन आवास + ॲपमध्ये अचूक Upload केलेली आहे. इच्छूक लाभधारकाने सांगितलेल्या माहितीव्यतिरिक्त इतर माहिती Upload करणेत आलेली नाही.

स्वाक्षरी--------- स्वाक्षरी --------

डेटा एन्ट्री ऑपरेटरचे नाव------- प्रगणकाचे नाव-------

## पोचपावती

श्री. / श्रीम.------ यांचे दि.-----रोजी सर्वेक्षण झालेले असून त्यांची माहिती आवास + ॲपमध्ये Upload करणेत आलेली आहे.

पोहोचपावती देणाऱ्याची सही------------- पोहोचपावती घेणाऱ्याची सही------------

पोहोचपावती देणाऱ्याचे नाव -------------पोहोचपावती घेणाऱ्याचे नाव-------------

(सदर पोहोचपावती पंचायत समिती कार्यालयास जमा करणेत आली.)

# पोचपावती

श्री. / श्रीम.------ यांचे दि.-----रोजी सर्वेक्षण झालेले असून त्यांची माहिती आवास + ॲपमध्ये Upload करणेत आलेली आहे.

पोहोचपावती देणाऱ्याची सही------------- पोहोचपावती घेणाऱ्याची सही------------

पोहोचपावती देणाऱ्याचे नाव --------------पोहोचपावती घेणाऱ्याचे नाव--------------

(सदर पोहोचपावती इच्छूक लाभधारकास उपलब्ध करुन देणेत आली.)